**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.३०३०** **दि. २०/०९/२०१९**

**प्रेस नोट दिनांक - २०/०९/२०१९**

**युनिट-३ गुन्हे शाखा पुणे ची कामगिरी-तडीपार सराईत गुंड जेरबंद, पिस्टल व काडतुस जप्त**

मा. डॉ. के. व्यंकटेशम् पोलीस आयुक्त पुणे शहर व मा. रविंन्द्र शिसवे पोलीस सह आयुक्त पुणे यांनी यांनी पुणे शहर यांनी आगामी विधानसभा निवडणुकी सन - २०१९ च्या अनुषंगाने पुणे शहरामध्ये कोणत्याही प्रकारे अनुचित प्रकार घडु नये निवडणुक शांततेत पडावी यासाठी पुणे शहर पोलीस अभिलेखावरील गुंड, फरारी, पाहीजे व तडीपार असलेले गुन्हेगार यांचा शोधे घेवुन त्यांचे हालचालीवर नजर ठेवुन त्यांचेविरुध्द कठोर कारवाई करणेबाबत सर्व पोलीस अधिकारी यांना आदेश दिलेले आहेत.

गुन्हे शाखा युनिट-३ पुणे येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी पोलीस अभिलेखा वरील गुंड, फरारी, पाहीजे व तडीपार असलेल्या गुन्हेगारांची माहीती काढुन त्यांचा शोध घेत असताना दिनांक - १९/०९/२०१९ रोजी पोहवा/संतोष क्षीरसागर यांना त्यांचे खब-याकडुन मिळालेल्या माहीतीवरुन पोलीसांनी सिंहगड रोड तुकाई नगरकडे जाणारे रोडवर फन टाईम मॉलजवळ सापळा लावुन पुणे शहर व जिल्हयामधुन दोन वर्षाकरिता तडीपार करण्यात आलेला गुंड रोहीदास ऊर्फ पिंटया लक्ष्मण गुप्ते वय-३६ रा-४२९/३० डायस प्लॉट झोपडपटटी पुणे यास पकडले आहे. **त्याचे ताब्यातुन एक पिस्टल व चार जिवंत काडतुसे असा किरु ७२,०००/- चे अग्निशस्त्रे हस्तगत करण्यात आलेले आहे.** मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ - २ पुणे शहर यांनी त्यास दिनांक - २४/१०/२०१८ पासुन दोन वर्षासाठी पुणे शहर व जिल्हयातुन तडीपार केलेले आहे.

वरील आरोपी हा पोलीस अभिलेखावरील नामचिन गुन्हेगार आहे यापुर्वी **त्याचेविरुध्द पुणे शहरातील स्वारगेट, कोथरुड, सिंहगड रोड, शिवाजीनगर, खडकी,वारजे माळवाडी, भारती विदयापीठ, फरासखाना पोलीस स्टेशन येथे एकुण ३१ गुन्हे दाखल आहेत.** त्यामध्ये खुनाचा प्रयत्न तीन, दरोडयाची तयारी तीन, जबरी चोरी चौदा, दुखापत तीन, विनयभंग तीन, हत्यार जवळ बाळगणे तीन, विनयभंग एक, बाललैंगिक अत्याचार एक या गुन्हयांचा समावेश आहे.

**त्याचेविरुध्द दोन वेळा एमपीडीए प्रमाणे कारवाई करुन त्यास स्थानबध्द करण्यात आले होते. तीन वेळा सीआरपीसी ११० प्रमाणे प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच तीन वेळा तडीपार करण्यात आलेले आहे. तसेच एक गुन्हयामध्ये मोका नुसार कारवाई करण्यात आलेली आहे.** मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो ३ेसी न्यायालय पुणे शहर यांचे न्यायालयात हजर केले असता त्यांनी त्यास दिनांक -२३/०९/२०१९ रोजी पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिलेले आहेत.

दिनांक-१९/०९/२०१९ रोजी पोलीसांना मिळालेल्या बातमीवरुन दांडेकर पुल सिंहगड रोड पुणे याठिकाणी सापळा लावुन पोलीस अभिलेखावरील घरफोडी चो-या करणारा सराईत गुन्हेगार सुजित सुनिल शेळके वय - २४ रा- सनं १३३ दांडेकर पुल पेट्रोलपंपासमोर पुणे यास पकडण्यात आलेले आहे. लोणावळा पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण गुरनं - २६९/२०१९ भादंवि कलम ४५४, ४५७, ३८० मधील फरार आरोपी असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास सदर पोलीसांच्या ताब्यात देण्यात आलेले आहे त्याचेविरुध्द यापुर्वी घरफोडी चोरीचे सात गुन्हे दाखल आहेत.

सदर कामगिरी गुन्हे शाखा, पुणे शहरचे अपर पोलीस आयुक्त श्री. अशोक मोराळे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे शहर श्री. बच्चन सिंग, सहायक पोलीस आयुक्त गुन्हे पुणे डॉ. शिवाजी पवार यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट - ३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजेंद्र मोकाशी, संजय गायकवाड, व गुन्हे युनिट-३ पथकातील पोलीस कर्मचारी संतोष क्षीरसागर, प्रविण तापकीर, संदिप तळेकर, दत्तात्रय गरुड, सुजित पवार, राहुल घाडगे, मच्छिंन्द्र वाळके, गजानन गानबोटे यांनी केली आहे.